“चाकूर व अहमदपूर तालुक्यातील ग्रामीण वस्त्यांचे भौगोलिक विश्लेषण”
(लातूर जिल्हा)

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

सामाजिकशास्त्रे विद्याशाखेतील भूगोल विषयाच्या पीएच.डी.

(विद्यावाचस्पती) पदवीकरिता सादर करावयाचा प्रबंध आराखडा

संशोधक

बळीराम अकुंशराव मोठेराव

(एमए.एम.फिल.भूगोल)

मार्गदर्शक

डॉ.नामदेव केशवराव वाघमारे

(एम.ए.सेट,पीएच.डी.भूगोल)

भूगोल विभागप्रमुख

इंदिरा गांधी महाविद्यालय,सिडको,नांदेड

संशोधन केंद्र

भूशास्त्र संकुल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ,नांदेड

मार्च २०१६

१.१ प्रस्तावना :

पृथ्वीवरील सजीव सृष्टीत सर्वात बुध्दीमान प्राणी म्हणुन मानवाचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे.मानव हा समाज प्रिय प्राणी असल्याने अनादिकाळापासुन त्याची समुह करुन राहण्याची प्रवृत्ती आज तागायत सुरु आहे.गुहा संस्कृतीत वावरणा-या आदीमानवापासुन ते अवकाश संस्कृतीपर्यंत पोहचलेल्या मानवापर्यंत वस्ती हा मानवाचा स्थायी भाव आहे.वस्ती म्हणजे मानवी संस्कृतीचा एक मुर्त अविष्कार होय.समुह प्रितीच्या जाणीवेतुन वस्त्यांचा उगम झाला. शेती कला मानवाला अवगत झाल्यानंत मानवाच्या स्थिर जिवनास सुरुवात झाली व मानव मैदानी प्रदेशात वस्ती करुन राहु लागला आणि येथुनच वस्ती भुगोलाचा विकास सुरु झाला.

मानव ज्या परीसरात आपली वस्तीनिर्माण करतो त्या वस्तीचा व भुगोल शास्त्रीय घटकांचा जवळचा संबंध आहे.मानवाचे संपुर्ण जिवन निर्सगावर अवलंबुन आहे. देशातील शहरी भागात २४.२८ टक्के लोकसंख्या वास्तव्य करते तर ग्रामीण भागात ७५.४२ टक्के लोकसंख्या आजही वास्तव्य करते.भारतात खेडयात राहणा-य लोकांचे प्रमाण जास्त असल्यामुळे भारताला खेडयांचा देश म्हणुन ओळखतात. म्हणुन ग्रामीण वस्त्यांच्या अभ्यासाला अतिशय महत्व प्राप्त झाले आहे.

विशेषत: नदयांच्या काठावर सूपीक मैदानी प्रदेशात मानवी वस्त्यांचा व तथाकथीत संस्कृतीचा उदय झाला. ग्रीस - युफ्राटीस नदयांच्या खो-यामध्ये बॉबीलानियन,सिंधु नदीच्या खो-यात सिंधु संस्कृती,हो यांग हो नदीच्या खो-यात मंगोल संस्कृतीचा उगम व विकास झाला. वसत्यांच्या कार्यात बदल होऊन त्यांचे रुपांतर मोठया नागरी वस्त्यांमध्ये झाले १६ व्या शतकापर्यंत मुंबई ही मासेमारी करणा-या कोळी लोकांची ग्रामीण वस्ती होती तथापी आज मुंबई हे जगातील एक महानगर म्हणुन ओळखले जाते.थोडक्यात प्राचिन काळात गुहेत राहणा-या प्राचिन आदिमानवापासुन ते आधुनिक काळातील वैविध्य पुर्ण वस्त्यांत राहणा-या व यांत्रीकी जिवन जगणा-या अध्यमानावा पर्यंत उत्क्रांत झालेल्या वस्त्यां म्हणजे काळाच्या ओघात मानवी संस्कृतीची प्रतिबिंबेच आहेत.

१.२ अभ्यास क्षेत्र :

लातूर जिल्हयाचे स्थान महाराष्ट्र राज्याच्या अग्नेय भागात येते.लातूर जिल्हयाचे अक्षवृत्तीय स्थान १८° २४' उत्तर अक्षयवृत्त ते १८° ४०'उतर अक्षय वृत्त आणि रेखावृत्तीय विस्तार ७६° ३४' पुर्व रेखावृत ते ७६° ३६'पुर्व रेखावृत्त यांच्या दरम्यान आहे. लातूर जिल्हयाचे एकूण क्षेत्रफळ ७१५७ चौ.कि.मी आहे.

या जिल्हयातील अहमदपूर व चाकूर तालुका अभ्यासासाठी निवडलेला आहे.अहमदपूर तालुक्याचा अक्षयवृत्तीय विस्तार १८° ४२'उत्तर अक्षवृत ते १८° ७२' उत्तर अक्षवृत आणि रेखावृतीय विस्तार ७६° ५३'पुर्व रेखावृत ते ७६° ९३'पुर्व रेखावृत दरम्यान आहे.

तसेच चाकूर तालुक्याचा अक्षयवृतीय विस्तार १८° ३०' उत्तर अक्षवृत ते १८° ३५' उत्तर अक्षवृत तसेच रेखावृतीय विस्तार ७६° ४०' पुर्व रेखावृत ते ७६° ५३' पुर्व रेखावृत दरम्यान आहे. अहमदपूर तालुक्याचे क्षेत्रफळ ७६३ चौरस किलोमीटर एवढे आहे. इस.२०११च्या जनगणना अहवालानुसार अहमदपूर तालुक्याची एकूण लोकसंख्या १,९२,२३२ एवढी आहे. सध्या तालुक्यात १२४ रहीवाशी वस्त्या आहेत.अहमदपुर तालुक्यात एकूण ०६ महसुल मंडळे आहेत. १.किनगाव २.अहमदपुर ३.खंडाळी ४.शिरुर ताजबंद ५.हाडोळती ६.

तसेच चाकूर तालुक्याचे क्षेत्रफळ ६६८ चौ.कि.मी.आहे.२०११ च्या जनगणना अहवालानुसार चाकूर तालुक्याची एकूण लोकसंख्या १,७८,०८९ एवढी आहे.सध्या या तालूक्यात रहीवाशी वस्त्यांची संख्या ८३ आहे.चाकूर तालुक्यात एकूण ०५ महसुल मंडळे आहेत. १.नळेगाव २. चाकूर ३. वडवळ ना. ४.झरी बु. ५. शेळगाव इत्यादी

१.३ ग्रामिण वस्त्यांच्या अर्थसंकल्पना प्रकार व महत्व :

वस्त्यांचा अर्थ :

वस्त्यांविषयी अनेक भुगोल तज्ञानी अभ्यास केलेला असून वस्ती हा शब्द लॅटीन भाषेतील (सटलमेंट) या इंग्रजी शब्दाचे मराठीत रुपांतर आहे. साधारणत: मानव आणि पर्यावरण यातील दृढ संबंधाचे धोतक म्हणजे वस्ती होय.

स्मिथ यांच्या मते स्थायी स्वरुपातील कोणतीही मानवी निवास स्थान वस्ती असते. एकाकी निवास स्थानाला सुध्दा अदिवास मानले जाते.वस्ती हा शब्द एका वाडी पासुन ते सलगार पर्यंत निवास गृहाला आणि घरांच्या समुहाला स्पष्ट करतो. डिकन्सन यांच्या मते शेतीवाडी गृहसमुह,नगरे इत्यादी मानवी समाजास आवश्यक असलेल्या सामाजीक - भौगोलिक घटकांची क्षेत्रीय व्यवस्था म्हणजे वस्ती किंवा अदिवास होय.

रामलोचन सिंह यांच्या मते वस्ती मानवाच्या संघटीत प्रवृतीला प्रदर्शीत करते,ज्यामध्ये ते निवास करतात,काम करतात,संचय करतात आणि मार्ग ज्यावर ये जा करतात. त्याचाही समावेश होतो. वस्ती म्हणजे भुपुष्टावरील मानव निर्मीत घटकांचा समुह असतो. ज्यामध्ये कांही एकाकी घरे,वाडी,खेडे या पासुन ते नगर,महानगर आणि सलगर पर्यंत सर्वांचा समावेश होतो. ओढे,नाले,नदया,सरोवरे,टेकडया,कालवे,रस्ते,चौक इत्यादी निसर्ग निर्मीत व मानव निर्मीत गोष्टींचा अविष्कार वस्त्यांच्या विविध आकृती बंधात झालेला आढळुन येतो ग्रामिण वस्त्यांचे संपुर्ण जिवन आजुबाजुच्या परीसराशी एकरुप झालेले आढळुन येते. ग्रामीण वस्त्यातील लोक शेती व्यवसायात गुंतलेले असतात.ही शेती वस्तीच्या आजु बाजुच्या परीसरामध्ये असते ग्रामीण वस्तीस साधरणतः दुकान,मंदीर,मस्जीद, चर्च आढळुन येतात.

लहान ग्रामीण वस्त्यांचा संपर्क जवळच्या मध्यवर्ती बाजारपेठेशी असतो तर मोठया ग्रामीण वस्त्यांतुन तालुक्याच्या ठिकाणी किंवा जिल्हयाची ठिकाणी जाण्यासाठी बारमाही रस्ते,रेल्वे इत्यांदीची सोय असते. संपुर्ण ग्रामीण वस्त्यांचा कृषि हा महत्वाचा व्यवसाय आहे.खाणकाम व वन व्यवसाय हे मानाने गौन अधार समजले जातात त्यामुळे सहजपणे कृषी व्यवसायच्या दर्जाच्या प्रतिबिंब ग्रामीण वस्त्यांच्या विस्तारात उमटलेले असते. ग्रामीण वस्त्यांनी व्यापलेला जमीनीचा भाग म्हणजे त्यांचा विस्तार त्याचप्रमाणे ग्रामीण विस्तारावरुन त्याचा परीसरातील नैसर्गीक,समाजीक व आर्थीक पर्यावरणाशी कल्पना येते ग्रामीण वस्त्यांचा विस्तार हा कालमानानुसार बदलत असतो. प्राकृतिक व सांस्कृतिक अशा दोन्ही प्रकारे घटक ग्रामीण वस्त्यांच्या विस्तारावर परिणाम घडवुन आणतात.

१.४ ग्रामीण वस्त्यांचे प्रकार व प्रारुप :

१. सघन ग्रामीण वस्त्या
२. अर्धसघन ग्रामीण वस्त्या
३. विखुरलेल्या ग्रामीण वस्त्या
४. अर्ध विखुरलेल्या ग्रामीण वस्त्या

१.५ ग्रामीण वस्त्यांचे प्रारुप :

१. चौरस आकार प्रारुप
२. वर्तुळ आकार प्रारुप
३. त्रिकोणी आकार प्रारुप
४. आयाताकार प्रारुप
५. अनियमीत प्रारुप
६. रेषाकृती प्रारुप
७. व्दीकेंद्रीत प्रारुप

१.६ संबंधीत साहित्याचा आढावा :

१. **कु.एलन सेंपल** (१९१२) या विदुषीच्या भुगोल शास्त्राच्या व्याख्येप्रमाणे मानव व गतिशील घटक आणि वस्ती ही मानवी संस्कृतीचे वैशिष्टय पुर्ण प्रतिक आहे.

२. **हडसन** (१९७६) या शास्त्रज्ञाने वस्त्यांना सजीवांची उपमा दिलेली आहे.ग्रामीण वस्त्यांच्या अभ्यास स्थानीक पातळीवर करण्यात येत असतो.

३. **गौतम भटाचार्य / अंजना देसाई** यांनी गुजरात राज्यातील भाला या किनारी प्रदेशातील ग्रामीण वस्तीच्या विकासाच्या समस्यांचा अभ्यास केलेला आहे.

४. **ब्रम्हस** : (१९१०) यांनी मानवी भुगोल या पुस्तकाच्या प्रथम खंडामध्ये घरांची निर्मीती ग्रामीण वस्ती आणी नागरी वस्ती स्थिती आणि प्रारुप यांचे विश्लेषण केले आहे.

५. **कूंभार** (१९७९) यांनी निरा नदीच्या खो-यातील ग्रामीण वस्त्यांचा प्रादेशीक अभ्यास केला आहे.

६. **डॉ.के.बी.कनकुरे** (१९८६) यांनी मराठवाडयातील ग्रामीण आणि नागरी वस्तीचा संशोधनात्मक अभ्यास केलेला आहे.यामध्ये मराठवाडयातील वस्तीच्या उत्क्रांतीपासुन ते १९८६ पर्यंत वस्ती मध्ये झालेल्या परिवर्तनाचे विश्लेषण केलेले आहे.

७. **सावंत** यांनी पुणे जिल्हयातील खडकी गावाचा विकास आणि बदल या दृष्टी कोनातुन अभ्यास केला आहे.

८. **पवार** यांनी बीड जिल्हयातील ग्रामीण वस्त्यांचे भौगोलिक विश्लेषण याचा अभ्यास केलेला आहे.

१.७ अभ्यासाचे उद्दीष्टे

१. ग्रामीण वस्त्यांच्या प्राकृतिक,सामाजिक,सांस्कृतिक व आर्थीक रचनेचा अभ्यास करणे

२. ग्रामीण वसत्यांच्या उत्क्रांतीचा ऐतीहासीक आढावा घेऊन नैसर्गीक,सांस्कृतिक घटकांशी असलेला संबंध अभ्यासणे

३. नैसर्गीक घटकांना अनुसरुन ग्रामीण वसत्यांच्या वितरणाचा शोध घेणे

४. ग्रामीण वस्त्यांचे स्थान व वस्त्यांची वाढ यांचा अभ्यास करणे

५. ग्रामीण वस्त्यांच्या प्रकारांचा व प्रारुपांचा अभिक्षेत्रीय अभ्यास करणे.

६. ग्रामीण वस्त्यांतील घरांची घनता व त्यानुसार घराचे प्रकार अभ्यासणे

७. अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वस्त्यांचे कार्य अभ्यासणे

८. अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वस्त्यातील सेवा सुविधांचा अभ्यास करणे

९. अभ्यास क्षेत्रातील ग्रामीण वस्त्यांच्या घर बांधकाम साहित्याचा अभ्यास करणे.

१.८ माहिती स्त्रोत :

सदरील संशोधन कार्यासाठी प्राथमीक व दुय्यम स्वरुपाच्या आकडेवारीचा अधार घेतला जाणार आहे.प्राथमीक स्वरुपाची माहिती शासकीय कार्यालय व निवडलेल्या गावातील कांही कूटुंब प्रमुखांना भेटी देऊन प्रश्नावलीच्या माध्यमातुन प्राप्त करण्यात येणार आहे.दुय्यम स्वरुपाची माहिती जिल्हा परिषदेचा वार्षीक अहवाल, सामाजिक व आर्थीक समालोचन,जनगणना पुस्तिका (१९९१,२००१,२०११) जिल्हा गॅझेटीयल भुगोल विषयाची विविध संदर्भ ग्रंथ महाराष्ट्र राज्य माहिती संचलानलय अहवाल,संशोधन लेख व इंटरनेट वरील विविध सांकेतीक स्थळांचा आधार घेतला जाणार आहे.

१.९ संशोधन पध्दती :

प्रस्तुत शोध प्रबंधासाठी मिळवण्यात येणारी प्राथमी व व्दितीय माहितीचे विश्लेषन विविध तक्ते व आलेखाच्या सहाय्याने केले जाणार आहे. हे विश्लेषण करण्यासाठी संख्यकीय पध्दती वापरली जाणार आहे.

१. ग्रामीण वस्त्यामधील लोकसंख्येची सरासरी काढण्यासाठी पुढील सुत्रांचा अधार घेतला आहे.

$$S = \frac{P}{N}$$

खुलासा :

S = ग्रामीण लोकसंख्येची सरासरी

P = ग्रामीण लोकसंख्या

N = ग्रामीण वस्त्यांची संख्या

२. अभ्यास क्षेत्रातील वस्त्यांतील प्रकाराचा अभ्यास करण्यासाठी मंडलच्या प्रकिर्षण सुची पध्दतीचा वापर करण्यात आलेला आहे.

$$\text{Index of} = \frac{\text{average poulation size of settlement (a)}}{\text{average spacing of settlement (b)}}$$

$$a = \frac{\text{Total Rural poulation}}{\text{No.of settlement}}$$

३. ग्रामीण वस्त्यांची घनता काढण्यासाठी खालील सुत्रांचा अवलंब करण्यात येणार आहे.

$$DRS = \frac{\text{Total of in habitted villages}}{\text{Total Rural area}}$$

DRS = ग्रामीण वस्त्यांची घनता

४. ग्रामीण वस्त्यातील सेवा सुविधांची क्षमता काढण्यासाठी पुढील सुत्रांचा अवलंब केला आहे.

$$Xie = \frac{Pi}{Mp}$$

खुलासा :

Xie = सेवा सुविधांची अपेक्षीत संख्या

Pi = एकूण ग्रामीण लोकसंख्या

Mp = प्रति एका सेवा सुविधांवर अवलंबुन असलेली लोकसंख्या

१.१०. प्रकरण मांडणी :

प्रकरण पहिले - संकल्पनात्मक मांडणी

१.१ प्रस्तावना

१.२ वस्ती भुगोलाची ओळख

१.३ वस्ती भुगोलाचे महत्व

१.४ वस्ती भुगोलाचा इतर शाखांशी संबंध

१.५ अभ्यास क्षेत्रांची निवड

१.६ उदिष्टे

१.७ माहिती स्त्रोत

१.८ संशोधन पध्दती

१.९ साहित्याचे पुनरावलोकन

प्रकरण दुसरे - अभ्यास क्षेत्राचे प्राकृतिक,सांस्कृतिक रचना

२.१ प्रस्तावना

२.२ स्थान

२.३ भु-उठाव

२.४ नदी प्रणाली

२.५ हवामान

२.६ मृदा

२.७ नैसर्गीक वनस्पती

२.८ कृषी

२.९ लोकसंख्या

२.१० वाहतुक व दळणवळण

२.११ सेवासुविधा

प्रकरण तिसरे - ग्रामीण वस्त्यांची उत्क्रांती आणि नावांचे भौगोलिक विश्लेषण

३.१ प्रस्तावना

३.२ पुर्व ऐतिहासिक व आर्य कालखंडातील ग्रामीण वस्त्या

३.३ बौध्द आणि हिंदु कालखंडातील ग्रामीण वस्त्या

३.४ स्वातंत्रोत्तर कालखंडातील ग्रामीण वस्त्या

३.५ ग्रामीण वस्त्यांची स्थलानुरुप नावे

३.६ नैसर्गीक व सांस्कृतिक घटकाला अनुसरुन ग्रामीण वस्त्यांची नावे

प्रकरण चौथा - ग्रामीण वस्त्यांचे प्रकार व प्रारुप

४.१ प्रस्तावना

४.२ ग्रामीण वस्त्यांचे प्रकार

४.३ ग्रामीण वस्त्यांची विविध प्रारुपे

४.४ ग्रामीण वस्त्यांच्या प्रारुपाच्या प्रादेशीक वितरणाचे विश्लेषण

प्रकरण पाचवे - ग्रामीण वस्त्यांचे स्थान व वितरण

५.१ प्रस्तावना

५.२ भुरचनेला अनुसरुन

५.३ लोकसंख्या घनतेला

५.४ रस्त्यांना अनुसरुन

५.५ लोकसंख्येच्या गटानुसार

५.६ ग्रामीण वस्त्यांच्या विरतणाचे अभिक्षेत्रीय प्रारुप

५.७ वस्त्यांचे स्थान

५.८ वस्त्यांच्या स्थानानुसार अभिक्षेत्रीय वितरण

प्रकरण सहावे - ग्रामीण वस्त्यांची वाढ,वस्त्यांचा आकार आणि अंतर

६.१ प्रस्तावना

६.२ वस्त्यांच्या संख्येतील वाढ

६.३ लोकसंख्या वाढ

६.४ लोकसंख्येला अनुसरुन ग्रामीण वस्त्यांचा आकार

६.५ वस्त्यांच्या सरासरी लोकसंख्येच्या आकारातील बदल

६.६ वस्त्यांच्या क्षेत्रांच्या सरासरी मधील बदल

६.७ वस्त्यां मधील सरासरी अंतर

प्रकरण सातवे - नमुना सर्वेक्षण

७.१ प्रस्तावना
७.२ वस्त्यांची अंतर्गत रचना
७.३ बांधकामानुसार घरांचे प्रकार
७.४ बांधकाम साहित्य
७.५ घरांची रचना
७.६ वस्त्यांची कार्य
७.७ सेवा सुविधांचे वर्गीकरण
७.८ सेवा सुविधांची कमतरता

प्रकरण आठवे - निष्कर्ष व उपाय योजना

संदर्भ ग्रंथ :

१. अहीरराव,वा.रा. (१९९७) : अधिवास भूविज्ञान,निराली प्रकाशन,पुणे
२. घारपुरे,व्ही.व्ही. (२००१) : वस्ती भूगोल,पिंपळापुरे प्रकाशन,नागपुर
३. भागवत,अ.वि. (१९९८८) : अधिवास भूगोल,नरेंद्र प्रकाशन,पुणे
४. कनकुरे,के.बी. (१९८६) : Marathwada : A Study in Settlement Geporphy, unpublished Ph.D Thesis
५. भोसले,ए .एस. (१९८५) : Kokan : A Study of Rural Settlement Geporphy, unpublished Ph.D Thesis To university of Poona
६. मेहता,जे.सी. (१९७७) : Habitat : Human Settlement & Environmental Health ; A System Approach, New Delhi.
७. शर्मा,आर.सी. (१९७२) : Settlement Geporphy of the Indian Desert , New Delhi.

संशोधक

बळीराम अंकुशराव मोठेराव
(एम.ए.एम.फिल,भूगोल)

मार्गदर्शक

डॉ.नामदेव केशवराव वाघमारे
(एम.ए.सेट,पीएच.डी.भूगोल)
भूगोल विभाग प्रमुख
इंदिरा गांधी महाविद्यालय,सिडको,नांदेड